

रजि. नं. महा/४३१/२०१६
एफ. १७९८६, (सांगली)

बळ एकीचे... नाते माणुसकीचे...

# ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था

## येळवी, ता. जत, जि. सांगली.

# ANNUAL REPORT 2024-25

1 April 2024 to 31 March 2025



रजि. नं. महा/४३१/२०१६ एफ. १७९८६, (सांगली)

बळ एकीचे... नाते माणुसकीचे...

# ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था

येळवी, ता. जत, जि. सांगली.

संस्थेचा इतिवृत्त.....

ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था गेली ३० वर्षे होऊन अधिक काळ कला क्रीडा सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देत आहे यामध्ये संस्थेच्या वतीने लोकसहभागातून स्पर्धा परीक्षा ग्रंथालयाची स्थापना, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबिरे आज, एस.टी महामंडळाचे 'स्मार्ट कार्ड' योजना, कन्यारत्न ठेव योजना, माजी सैनिक ,सैनिक पत्नी, अशा वर्कर, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस यांचा सन्मान सोहळा, महिला दिन, जनरल नॉलेज स्पर्धा परीक्षा, प्रबोधनात्मक व्याख्यानमाला, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पॅन कार्ड, आधारकार्ड, रेशन कार्ड शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, विविध महापुरुषांची जयंती, सांस्कृतिक कार्यक्रम अशी विविध लोकोपयोगी समाज उपयोगी कामे संस्थेच्यावतीने करण्यात आली आहेत .

गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन, केरळ पूरग्रस्तांसाठी संस्थेकडून मदत, आरोग्य शिबिरा अंतर्गत अनेक गरजूंना मोफत औषध उपचार, 'श्रीं' च्या प्रतिष्ठापनेने वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम, पाणी फौंडेशनमध्ये संस्थेचा सक्रिय सहभाग व सहभागाबद्दल प्रशस्तीपत्र, लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक कार्यक्रम, पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षणासाठी ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियमची स्थापना, स्पर्धात्मक परीक्षेसाठी विशेष वर्गाची व्यवस्था. ओंकार स्वरूपा या संस्थेने केंद्र सरकारने ग्रामीण व गरीब गरजू जनतेसाठी 'आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना' चे गोल्डन कार्ड तयार करण्यासाठीच्या शिबिराचे आयोजन.

फॅशन डिझायनिंग कोर्स ५० महिलांना तीन महिन्याकरिता मोफत प्रशिक्षण.

कोरोना काळात विधवा परितक्त्या, एकल महिलांना मोफत दोन महिने पुरेल इतके किराणा साहित्य.

कोरोना संकटकाळात वन विभाग व कृषी विभागांमध्ये गावातील ५० बेरोजगार नागरिकांना रोजगार हमीच्या कामातून काम मिळवून दिले व त्याची रक्कम रुपये रोजगार ३ लाख रूपये त्या लोकांना रोजगार मिळवून दिला.

आमच्या संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक मा. अनिल अंकलगी साहेब यांच्या संकल्पनेतून ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज साकार होत आहे. ग्रामीण भागात इंग्रजीचे ज्ञान विद्यार्थ्यास मिळावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वाढत्या स्पर्धेच्या युगात पुढे जाण्यासाठी व आवश्यक असलेले शिक्षण मिळावे म्हणून या प्रशालेची सुरुवात करण्यात आलेली आहे. व त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुलींना सायन्ससाठी परगावी न जाता आपल्याच गावात शिक्षण मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून अंकलगी साहेबांनी ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची स्थापना केली.

केंद्र शासनाच्या जिल्हास्तरीय उत्कृष्ट संस्था पुरस्काराने संस्थेला सन्मानित करण्यात आले आहे. विविध शासकीय योजनाची माहिती बद्दल संस्थेला जत तहसील कार्यालय यांच्याकडून प्रशस्त पत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. तसेच जिल्हा सैनिक बोर्ड सांगली यांच्याकडून सैनिकांचा सन्मान सोहळा आयोजित केल्याबद्दल गौरव पत्र देऊन संस्थेला सन्मानित करण्यात आले आहे.

**संतोष माणिकराव पाटील**
सचिव : ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था
मो. ९१३००२३३०७

# अनुक्रमणिका ...

१. संस्थेची माहिती ........................................................................................... 03

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती.... संगणक प्रशिक्षण

३. स्वातंत्र्य दिन ध्वजारोहन, १ मे महाराष्ट्र दिन. ........................................................ 04

४. शिक्षक दिन साजरा, रक्षा बंधन ......................................................................... 05

५. येळवी प्रीमियर लीग -2024 ... आषाढी वारी दिंडी सोहळा ................................... 06

६. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत .... ....................................................................... 07

७. तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत १ क्रमांक ... गणेशात्सवानिमित्त मनोरंजक कार्यक्रम... 08

८. राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत सहभाग ...Egg Day Celebration ... .................. 09

९. तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा ... ...........................................................................10

१०. मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन ................................ 11

११. ओंकार स्वरुपा फेस्टिव्हल ... .......................................................................... 12

१२. हळदी कुंकू समारंभ २०२५ ... निरोप समारंभ ... .................................................. 13

१३. महिला आर्थिक सक्षमीकरण ... बालविवाह जनजागृती अभियान ... ......................... 14

१४. शैक्षणिक सहल प्राथमिक विभाग ...

शैक्षणिक सहल माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग ... ........................................ 15

१५. आंतरशालेय क्रीडा स्पर्धा ................................................................................ 16

१६. सायन्स डे ...छत्रपती शिवाजी महाराज जयंती ... .................................................. 17

# संस्थेची माहिती ...

संस्थेचे आधारस्तंभ



**मा. अनिल अंकलगी**

संस्थेचे अध्यक्ष



**मा. दिपक (आण्णा) अंकलगी**

संस्थेचे सचिव



**मा. संतोष पाटील**
ग्रा.प. सदस्य, येळवी.

'बळ एकीचे... नाते माणूसकीचे', हेच ब्रीद वाक्य घेऊन मागील ३० वर्षांपासून ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था काम करत आहे.

ओंकार स्वरुपा ही केवळ एक संस्था नाही तर एक व्यासपीठ आहे. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सहकाऱ्यांशी समन्वय साधून सहकाऱ्यांच्या सहकार्याने एक रचनात्मक कार्य करावे हा मुख्य हेतू ठेवून संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

संस्थेच्या या जडणघडणीत अनेकांचा वाटा आहे. सर्वांच्या सहकार्याच्या जोरावरच संस्थेने आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत 'माणूसकी हाच धर्म' मानून कार्य केलेले आहे.

संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत येळवी सह पंचक्रोशीतील नागरीकांसाठी अनेक समाजोपयोगी, लोकोपयोगी कार्य केले आहे. यामध्ये तालुक्यातील खेळाडूंसाठी येळवी प्रिमियर लिगचे आयोजन केले, वारकरी दिंडी सोहळा, गणेशोत्सवानिमित्त हिप्नॉटिझमचा कार्यक्रम, राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत सहभाग, आरोग्य तपासणी व आहार माहिती कार्यक्रम, मतदान जनजागृती कार्यक्रम, शालेय अंतर्गत क्रीडा स्पर्धा तसेच तालुकास्तरीय क्रीडार स्पर्धा आयोजित केल्या आहेत. वार्षिक स्नेहसंमेलन, बालविवाह जनजागृती अभियान प्रभागतफेरी, खवय्यांची जत्रा, महापुरुष जयंती व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. असे अनेक नवनवीन उपक्रम राबवून माणूसकीचं नातं आणि एकीचं बळं निर्माण केलेलं आहे...

आज या संस्थेचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. लहानापासून थोरापर्यंत... येळवीसह पंचक्रोशीतील नागरिकांना संस्था आपलीशी वाटू लागते यामध्ये सारे आले.

**सर्व सन्माननीय सदस्य, पदाधिकारी व कर्मचारी वृंद**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ...

१४/४/२०२४ रोजी ओंकार स्वरुपा प्रशालेमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.




## संगणक प्रशिक्षण ...







ओंकार स्वरुपा इंग्लिश मिडियम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज येळवी, येथे खास विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव संगणक शिक्षण सुरुवात.

## १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन ध्वजारोहन ...



## १ मे महाराष्ट्र दिन साजरा ...



## शिक्षक दिन साजरा ...



५ सप्टेंबर रोजी प्रशालेत शिक्षक दिन साजरा करताना निगडी केंद्राचे केंद्र प्रमुख मा. सुखदेव शिंदे सर

## रक्षाबंधन ...



भाऊ-बहिणीचा रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा करताना विद्यार्थी...

## शिक्षक दिन साजरा ...





ओंकार स्वरुपा प्रशालेचे वनभोजन बनाळी येथील बनशंकरी देवस्थान येथे करण्यात आले या प्रसंगी उपस्थित विद्यार्थी.

## येळवी प्रीमियर लीग -2024 ...




## आषाढी वारी दिंडी सोहळा ...





ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी.. मंगळवार दि.16 जुलै 2024 रोजी आषाढी एकादशी निमित्त "वारकरी दिंडी सोहळयाचे" आयोजन केले आहे. या दिंडी सोहळ्यामध्ये भक्ती गीते, विविध पोशाख परिधान केलेले अनेक वारकरी, तसेच संत मंडळींची वेशभूषा केलेले ओंकार स्वरूपा प्रशालेचे विद्यार्थी- विद्यार्थिनी भक्तीगीते सादर करणार आहेत, तरी या कार्यक्रमास उपस्थितीत रहावे.



# नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत ...






ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी येथे इयत्ता 11वीच्या सायन्स शाखेच्या नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न झाला..

यावेळी काराजनगी जि.प.शाळेचे माजी मुख्याध्यापक आण्णाराव पाटील (सर) , एस. व्ही .आर .डी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज शेगावचे शिक्षक चंद्रकांत कोडग (सर), तनिष्का फाउंडेशनचे कार्याध्यक्ष मा.अशोक गोरडसो, संस्थेचे अध्यक्ष मा दीपक (आण्णा) अंकलगी, सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, नवनाथ पवार, प्राचार्य मा.भारत निळे (सर) शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते....

यावेळी प्रशालेचे सहाशिक्षक शुभम अठराबुद्धे सर यांची जि प शाळा सनमडी येथे प्राथमिक शिक्षक या पदावर ती नियुक्ती झाल्याबद्दल प्रशालेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.... प्रशालेतील अनेक शिक्षकांनी परवाच झालेल्या शिक्षक पात्रता परीक्षेत यश मिळवल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करण्यात आले....



## ओंकार स्वरूपा स्कुल ग्रामीण भागातील यशस्वी संस्था : आण्णाराव पाटील

दै. वाळवा क्रांती \ जत

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या ११ वीच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभप्रसंगी श्री. पाटील बोलत होते.

यावेळी एस. व्ही .आर .डी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज शेगावचे शिक्षक चंद्रकांत कोडग, तनिष्का फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अशोक गोरड, ओंकारस्वरूपा फौंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक अंकलगी, सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, नवनाथ पवार, प्राचार्य भारत निळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ओंकार स्वरूपा प्रशालेचे सहशिक्षक शुभम अठराबुद्धे यांची जि. प. शाळा सनमडी येथे प्राथमिक शिक्षक या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल प्रशालेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ओंकार स्वरूपा प्रशालेचे सहशिक्षक शुभम अठराबुद्धे यांची जि. प. शाळा सनमडी येथे प्राथमिक शिक्षक या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल प्रशा-लेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री. पाटील म्हणाले, जतच्या शैक्षणिक क्षेत्रात अवघ्या दोन वर्षात येळवी येथील ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सर्वच क्षेत्रात उज्ज्वल यश ओंकारस्वरूपाने मिळवले आहे. ओंकार स्वरूपाच्या यशाची परंपरा विद्यार्थ्यांनी जपावी असे आवाहन काराजनगी जि.प. शाळेचे माजी मुख्याध्यापक आण्णाराव पाटील यांनी केले. ग्रामीण भागात इंग्लिश मिडीयम संस्था चालवणे सहज, साधी, सोपी गोष्ट नाही पण ओंकारस्वरूपाने हे व्रत स्वीकारले आहे. किमान आपल्या भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी संस्था प्रामाणिकपणे कार्य करत आहे. एलकेजी ते १२वी पर्यंत सध्या अध्यापनाचे काम सुरू आहे. दोन वर्षाचा संस्थेचा लेखा जोखा हा अभिनमानस्पद असल्याचे सांगत ओंकार स्वरूपाच्या यशाचे त्यांनी कौतुक केले. चंद्रकांत कोडग, अशोक गोरड यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष दीपक अंकलगी व संतोष पाटील यांनी ओंकारस्वरूपामध्ये राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती देत दर्जेदार शिक्षण देण्यावर आपला भर असल्याचे सांगितले.



पुण्य नगरी

## ओंकारस्वरूपाच्या यशाची परंपरा विद्यार्थ्यांनी जपावी

आण्णाराव पाटील

जत / प्रतिनिधी

जतच्या शैक्षणिक क्षेत्रात अवघ्या दोन वर्षात येळवी येथील ओंकारस्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सर्वच क्षेत्रात उज्ज्वल यश ओंकारस्वरूपाने मिळवले आहे. ओंकारस्वरूपाच्या यशाची परंपरा विद्यार्थ्यांनी जपावी, असे आवाहन काराजनगी जि. प. शाळेचे माजी मुख्याध्यापक आण्णाराव पाटील यांनी केले.

ओंकारस्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या ११ वी च्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभप्रसंगी पाटील बोलत होते. यावेळी एस. व्ही. आर. डी. हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज शेगावचे शिक्षक चंद्रकांत कोडग, तनिष्का फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अशोक गोरड, ओंकारस्वरूपाचे संस्थापक अध्यक्ष दीपक अंकलगी, ग्रा. पं. सदस्य संतोष पाटील, नवनाथ पवार, प्राचार्य भारत निळे प्रमुख उपस्थित होते. यावेळी ओंकारस्वरूपाचे सहशिक्षक शुभम अठराबुद्धे यांची जि. प. शाळा सनमडी येथे प्राथमिक शिक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रशालेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

जत : ओंकारस्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या ११ वी विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभप्रसंगी मान्यवर.

पाटील म्हणाले, ग्रामीण भागात इंग्लिश मिडीयम संस्था चालवणे सहज, साधी, सोपी गोष्ट नाही पण ओंकारस्वरूपाने हे व्रत स्वीकारले आहे. किमान आपल्या भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी संस्था प्रामाणिकपणे कार्य करत आहे. एलकेजी ते १२ पर्यंत अध्यापनाचे काम सुरू आहे. दोन वर्षाचा संस्थेचा लेखाजोखा हा अभिनमानास्पद असल्याचे सांगत ओंकारस्वरूपाच्या यशाचे त्यांनी कौतुक केले. चंद्रकांत कोडग, अशोक गोरड यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष दीपक अंकलगी व संतोष पाटील यांनी ओंकारस्वरूपामध्ये राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत दर्जेदार शिक्षण देण्यावर आपला भर असल्याचे सांगितले.

Sangli Edition
Aug 8, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

## तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक ...





ओंकार स्वरूपाच्या विध्यार्थिनींनी मिळवला तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक....

ओंकार स्वरूपा फौडेशन संस्था संचलित ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी या प्रशालेतील विद्यार्थिनींनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद सांगली व रेवनाळ हायस्कूल रेवनाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा सन 2024 या स्पर्धेमध्ये ओंकार स्वरूपा प्रशालेतील मुलींनी वयोगट 17 मधून प्रथम क्रमांक मिळवला असून या संघाची जिल्हास्तरासाठी निवड झाली आहे. तसेच 17 वर्ष वयोगटातील मुलांनी तिसरा क्रमांक मिळवला आहे...

यासाठी संस्थेचे मार्गदर्शक मा. अनिल अंकलगी साहेब, संस्थेचे अध्यक्ष दीपक (आण्णा) अंकलगी, सचिव संतोष पाटील, मुख्याध्यापक भारत निळे सर, क्रीडाशिक्षक करीमसो नाईक यांचे मार्गदर्शन लाभले. मुलींच्या या यशासाठी कष्ट घेणाऱ्या सर्व क्रीडाशिक्षक आणि स्टाफचे मनापासून आभार..!

## गणेशात्सवा निमित्त मनोरंजक कार्यक्रम ...

ओंकार स्वरूपा फौडेशन संस्था गणेशोत्सव मंडळ येळवी, ता. जत येथे मंगळवार दि. 10/09/2024 रोजी सायंकाळी ठिक 07:00 वाजता. मा. सूर्यकांतजी चव्हाण (सर) इंदापूर यांचा हिप्नॉटिझम (मॅजिक) कार्यक्रम संपन्न झाला. सादरकर्ते : संमोहन उपचार तज्ञ मास्टर सूर्यकांतजी चव्हाण (सर)



## राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत सहभाग ...

तनिष्का फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत भाग घेतलेला विद्यार्थ्यांना प्रशस्ती प्रमाणपत्र वितरण. तनिष्का फाउंडेशनच्या कार्याध्यक्ष मा. अशोक गोरड, येळवी येथील पशुवैद्यकीय अधिकारी मा.संतोष चांगन साहेब, चव्हाण साहेब, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.





तनिष्का फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आयोजित चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना सांगली जिल्ह्याचे खासदार मा. विशाल (दादा) पाटील, आमदार मा. विक्रमसिंह (दादा) सावंत सोबत मान्यवर.

## Egg Day Celebration ...

ओंकार स्वरूपा प्रशालेमध्ये पशुवैद्यकीय अधिकारी मा संतोष चांगण साहेब यांनी विद्यार्थ्यांना कोंबडीच्याअंड्याचे महत्त्व सांगितले. अंडी दररोजच्या आहारात मुलांनी का घ्यावी...? अंड्या पासून मिळणारी पोषक तत्वे... खेळाडूंनी अंड्याचा आहारात समावेश केल्याने होणारा फायदा समजून सांगितला.... व प्रत्येक विद्यार्थ्याला अंडी खाण्यास दिली







# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा ...






ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था व नेहरू युवा केंद्र सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन येळवी गावचे ज्येष्ठ नागरिक मा. पंचाक्षरी (काका) अंकलगी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नेहरू युवा केंद्राचे लेखाधिकारी व कार्यक्रम सुपरवायझर मा. सिद्धार्थ चव्हाणसो व कार्यालय सहाय्यक सागर व्हनमाने, येळवी गावच्या सरपंच सौ.आरतीताई अंकलगी, श्री समर्थ हायस्कूलचे मुख्याध्यापक नंदकुमार खंडागळे, हंगिरगे शाळेचे मुख्याध्यापक आनंदा क्षीरसागर, संस्थेचे सचिव तथा ग्रा.पं.सदस्य संतोष पाटील,दै. पुढारी तालुका प्रतिनिधी विजय रुपनर (सर), कृष्णप्रकाश गुरुकुल विद्यापीठाचे ज्ञानेश्वर आवटे सो,दत्तात्रय साळे सर, नवनाथ तेरवे मेजर आदी उपस्थितीत होते.

या तालुकास्तरीय स्पर्धेत जवळपास 400 खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता त्यामध्ये कबड्डी, खो-खो ,100 मीटर धावणे, गोळाफेक या स्पर्धा घेण्यात आल्या. कबड्डी स्पर्धा:-प्रथम शिवप्रतिष्ठान संघ जत, द्वितीय- जाडरबोबलद संघ, तृतीय क्रमांक बिळूर संघ, खो-खो स्पर्धा प्रथम- जि.प. शाळा काराजनगी, द्वितीय- ओंकार स्वरूपा स्कूल येळवी. गोळाफेक मुले-प्रथम- देवराज दत्तात्रय पवार, द्वितीय- धोंडीराम यमगर,तृतीय- भावेश शहाजी पाटोळे. गोळा फेक मुली-प्रथम- स्नेहल संजय पवार, द्वितीय-सानिका विजय पवार,तृतीय- ऋतुजा चंद्रकांत कदम. 100 मीटर धावणे मुले प्रथम- भावेश शहाजी पाटोळे, द्वितीय- अजिंक्य विठ्ठल जाधव, तृतीय-ओंकार सुनील बोरकर. 100 मीटर धावणे मुली प्रथम- ऋतुजा गेणू गायकवाड,द्वितीय- स्नेहल संजय पवार, तृतीय- अमृता गुंडू गायकवाड

वरील क्रीडा स्पर्धेसाठी जि.प. शाळेचे सिद्धेश्वर कोरे ,दीपक कांबळे, अमजद नाईक ,टेंगले सर, महानोर सर, भारत क्षीरसागर, आदि शिक्षकांनी पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी ओंकार स्वरूपाचे क्रीडाशिक्षक करीमसो नाईक, महादेव डोंबाळे, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.








दैनिक बंधुता

इब्राहिम शेख 9850868586

सांगली | कोल्हापूर | सातारा | सिंधुदुर्ग

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**बंधुता न्यूज नेटवर्क**

जत : ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था व नेहरू युवा केंद्र सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन येळवी गावचे ज्येष्ठ नागरिक मा. पंचाक्षरी (काका) अंकलगी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नेहरू युवा केंद्राचे लेखाधिकारी व कार्यक्रम सुपरवायझर मा.सिद्धार्थ चव्हाणसो व कार्यालय सहाय्यक सागर व्हनमाने, येळवी गावच्या सरपंच सौ.आरतीताई अंकलगी, श्री समर्थ हायस्कूलचे मुख्याध्यापक नंदकुमार खंडागळे, हंगिरगे शाळेचे मुख्याध्यापक आनंदा क्षीरसागर, संस्थेचे सचिव तथा ग्रा.पं.सदस्य संतोष पाटील,दै. पुढारी तालुका प्रतिनिधी विजय रुपनर (सर), कृष्णप्रकाश गुरुकुल विद्यापीठाचे ज्ञानेश्वर आवटे सो,दत्तात्रय साळे सर, नवनाथ तेरवे मेजर आदी उपस्थितीत होते.

या तालुकास्तरीय स्पर्धेत जवळपास ४०० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता त्यामध्ये कबड्डी,खो-खो ,१०० मीटर धावणे, गोळाफेक या स्पर्धा घेण्यात आल्या.कबड्डी स्पर्धा:- प्रथम शिवप्रतिष्ठान संघ जत, द्वितीय- जाडरबोबलद संघ,तृतीय क्रमांक बिळूर संघ ,खो-खो स्पर्धा प्रथम-जिल्हा परिषद शाळा काराजनगी,द्वितीय- ओंकार स्वरूपा स्कूल येळवी.गोळाफेक मुले-प्रथम- देवराज दत्तात्रय पवार, द्वितीय- धोंडीराम यमगर,तृतीय- भावेश शहाजी पाटोळे. गोळा फेक मुली-प्रथम- स्नेहल संजय पवार, द्वितीय- सानिका विजय पवार,तृतीय- ऋतुजा चंद्रकांत कदम. १०० मीटर धावणे मुले प्रथम- भावेश शहाजी पाटोळे, द्वितीय- अजिंक्य विठ्ठल जाधव, तृतीय- ओंकार सुनील बोरकर.१०० मीटर धावणे मुली प्रथम- ऋतुजा गेणू गायकवाड,द्वितीय- स्नेहल संजय पवार, तृतीय-अमृता गुंडू गायकवाड वरील क्रीडा स्पर्धेसाठी जि.प. शाळेचे सिद्धेश्वर कोरे ,दीपक कांबळे, अमजद नाईक ,टेंगले सर, महानोर सर, भारत क्षीरसागर, आदि शिक्षकांनी पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी ओंकार स्वरूपाचे क्रीडाशिक्षक करीमसो नाईक, महादेव डोंबाळे, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९ पुढारी

www.pudhari.com

जत : येळवी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यावेळी उपस्थित मान्यवर.

## येळवीत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

### ४०० खेळाडूंचा सहभाग : कबड्डी स्पर्धेत चुरस

**जत : पुढारी वृत्तसेवा**

येळवी (ता. जत) येथे ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेचे आयोजन नेहरू युवा केंद्र व ओंकार स्वरूपा फाऊंडेशन या संस्थेच्यावतीने करण्यात आले होते. स्पर्धेत ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कबड्डीत मोठी चुरस पाहायला मिळाली.

उद्घाटन येळवी सोसायटीचे माजी अध्यक्ष पंचाक्षरी अंकलगी यांनी केले. यावेळी नेहरू युवा केंद्राचे लेखाधिकारी सिद्धार्थ चव्हाण, सागर व्हनमाने, सरपंच आरती अंकलगी, श्री समर्थ हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य नंदकुमार खंडागळे आदी उपस्थित होते.

मोठ्या गटात कबड्डीत शिवप्रतिष्ठान संघ जत या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. जाडरबोबलाद संघाने द्वितीय, तर बिळूर संघाने तृतीय क्रमांक मिळवला. खो-खोत काराजनगी येथील जिल्हा परिषद शाळेने प्रथम क्रमांक, तर ओंकार स्वरूपा स्कूल येळवी या प्रशालेस द्वितीय क्रमांक मिळाला.

वैयक्तिक खेळ प्रकारात गोळाफेक स्पर्धेत देवराज दत्तात्रय पवार याने प्रथम, धोंडिराम यमगर याने द्वितीय, तर भावेश शहाजी पाटोळे याने तृतीय क्रमांक मिळवला. गोळाफेकमध्ये मुलींच्या गटात स्नेहल संजय पवार हिने प्रथम, सानिका विजय पवार हिने द्वितीय, तर ऋतुजा चंद्रकांत कदम हिने तृतीय क्रमांक मिळवला.

१०० मीटर धावणे स्पर्धेत मुलांच्या गटात भावेश पाटोळे याने प्रथम, अजिंक्य जाधव याने द्वितीय, तर ओंकार सुनील बोरकर याने तृतीय क्रमांक मिळवला. मुलींमध्ये ऋतुजा गेणू गायकवाड हिने प्रथम, स्नेहल पवार (द्वितीय) व अमृता गायकवाड हिने (तृतीय) क्रमांक मिळवला.

Sangli Edition

Jan 10, 2025 Page No. 05

Powered by: erelego.com

## मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन ...

ओंकार स्वरूपा प्रशालेमध्ये मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन...

२८८ जत विधानसभा मतदार संघ सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत शालेय विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा ,चित्रकला स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन केले होते... यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला







# ओंकार स्वरुपा फेस्टिव्हल ...




ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था येळवी संचलित, ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी. या प्रशालेचे वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा पारितोषिक वितरण मोठ्या दिमाखात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन जत पोलीस स्टेशनचे ए.पी.आय मा. लातूरे साहेब यांच्या हस्ते संपन्न झाले.





यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून म्हाडाचे कार्यकारी अभियंता मा.श्री. अनिल अंकलगी साहेब तसेच प्रमुख पाहुणे म्हणून येळवीच्या सरपंच सौ. आरती अंकलगी, उपसरपंच विश्वास खिलारे, येळवी सर्व सोसायटीचे चेअरमन सुरेश जगताप, सनमडी केंद्राचे केंद्रप्रमुख सुखदेव शिंदे सर, सिद्धेश्वर कोरे सर, श्री समर्थ हायस्कूल मुख्याध्यापक नंदकुमार खंडागळे सर, एकलव्य अकॅडमीचे संस्थापक ज्ञानेश्वर आवटे, संत ज्ञानेश्वर आश्रम शाळेचे मुख्याध्यापक महेश बाबानगर सर, संस्थेचे अध्यक्ष मा. दिपक(आण्णा) अंकलगी, संस्थेचे सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य मा.संतोष पाटील, उपाध्यक्ष संतोष स्वामी, दै.पुढारी तालुका प्रतिनिधी विजय रुपनर, दैनिक पुण्यनगरी तालुका प्रतिनिधी मारुती मदने,प्रशालेचे प्राचार्य भारत निळे सर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदी च्या उपस्थितीत कार्यक्रम मोठ्या उत्साह संपन्न झाला.

अनेक मराठी लोकगीते, भावगीते, मराठी व हिंदी गाण्यासह सह विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली. विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

शाळांतर्गत झालेल्या क्रीडा स्पर्धेचे व शालेय तालुकास्तरांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ यावेळी करण्यात आला. नेहरू युवा केंद्र व ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय स्पर्धेचे पारितोषिक वितरण सुद्धा यावेळी करण्यात आले. यावेळी पालक विद्यार्थी व परिसरातील नागरिकांनी कार्यक्रमासाठी भरपूर गर्दी केली होती.





## हळदी कुंकू समारंभ २०२५ ...

ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था आयोजित हळदी कुंकू समारंभ कार्यक्रम












## निरोप समारंभ ...






ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडीयम स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज इयत्ता 12 वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज माडग्याळचे प्राचार्य मा.एस.आय. हिरगोंड सर सहशिक्षक पुजारी एस.आय. ज्येष्ठ नेते पंचाक्षरी काका अंकलगी, अरविंद काका वाणी, संस्थेचे अध्यक्ष मा.दिपक आण्णा अंकलगी, सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, प्राचार्य भारत निळे सर शिक्षक व इतर स्टाफ उपस्थितीत होता.

# महिला आर्थिक सक्षमीकरण ...

ग्रामपंचायत येळवी, ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था येळवी व अंबिका महिला ग्रामसंस्था,येळवी. स्वरांगिनी महिला ग्रामसंघ येळवी. व महिला बचत गट येळवी यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाच्या औचित्य साधून येळवी, जत येथे "खवय्यांची जत्रा"हा इव्हेंन्ट आयोजित केला आहे. यामध्ये महिला विविध प्रकारच्या खाण्याचे 40 स्टॉल असून, अत्यल्प कमी दरात ना-नफा- ना- तोटा या तत्त्वावर वेगवेगळ्या खाद्यपदार्थांची विक्री केली जाणारा आहे. या ठिकाणी बसून खाण्याची सोय त्याचबरोबर खाद्यपदार्थाच्या पार्सलची सोय केलेली आहे. तरी येळवी परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा.

सलग तिसऱ्या वर्षी येळवी मध्ये अशा प्रकारचे नियोजन केले असून महिलांच्या मध्ये व्यवसायाबद्दल आत्मविश्वास निर्माण व्हावा.. महिलांचे आर्थिक बळकटीकरण व्हावे.. महिलांच्यातील पाककलेला वाव मिळावा या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे..






# बालविवाह जनजागृती अभियान ...







प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

**येळवीत महिला दिनानिमित्त जनजागृती फेरीचे आयोजन**

जत : पुढारी वृत्तसेवा

येळवी (ता. जत) येथे ओंकार फाऊंडेशनच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त शनिवारी सकाळी ९ वाजता बालविवाह जनजागृती प्रभात फेरी काढण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता महिला बचत गट सक्षमीकरणअंतर्गत विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात येणार असल्याची माहिती येळवीच्या सरपंच आरती अंकलगी यांनी दिली.

अंकलगी म्हणल्या, या उपक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत येळवी, ओंकारस्वरूपा फौंडेशन संस्था व अंबिका महिला ग्रामसंस्था, स्वरांगिनी महिला ग्रामसंघ येळवी व महिला बचत गट यांच्या पुढाकारातून होणार आहे.

Sangli Edition
Mar 07, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

ग्रामपंचायत येळवी व ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था येळवी यांच्या संयुक्त विद्यमाने "जागतिक महिला दिनानिमित्त" आयोजित बालविवाह जनजागृती प्रभात फेरीचे काढण्यात आली यावेळी येळवीच्या सरपंच सौ. आरतीताई अंकलगी, उपसरपंच विश्वास खिलारे, येळवीच्या पोलीस पाटील सौ. वंदना माने-पाटील, ओंकार स्वरूपाचे अध्यक्ष मा. दिपक (आण्णा) अंकलगी, ग्रामपंचायत सदस्य, येळवी प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी डॉ. अमोल पाटील, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, बचत गटातील अनेक महिला, याबरोबर निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख मा. सुखदेव शिंदे सर, यांच्यासोबत प्रशालाचे विद्यार्थी व शिक्षक स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## शैक्षणिक सहल प्राथमिक विभाग ...

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी, या प्रशालेची इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल (वन डे ट्रिप) बळीराजा अग्रो टुरिझम अँड वॉटर पार्क मालगाव या ठिकाणी गेली होती...









## शैक्षणिक सहल माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग ...









# आंतरशालेय क्रीडा स्पर्धा ...



पुण्य नगरी

जत : ओंकारस्वरूपाच्या शालेय अंतर्गत स्पर्धेचे उद्घाटन करताना चेअरमन सुरेश जगताप.

## विद्यार्थ्यांनी मैदानी खेळाला प्राधान्य द्यावे : सुरेश जगताप

**जत / प्रतिनिधी**

आजच्या मोबाईलच्या युगात सोशल मीडिया म्हणजे जणू सर्व काही आहे. मोबाईलवरच अनेक गेम्स सहज उपलब्ध होत असल्याने शाळेत शिकणाऱ्या मुलांना, विद्यार्थ्यांना सुद्धा मोबाईलचे वेड लागले आहे. स्पर्धेच्या या युगात मोबाईलचा वापर जपून करत विद्यार्थ्यांनी मैदानी खेळाकडे वळावे, असे आवाहन येळवी सोसायटीचे चेअरमन सुरेश जगताप यांनी केले.

येळवी येथील ओंकारस्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज येथे शालेय अंतर्गत क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन येळवी सोसायटीचे चेअरमन सुरेश जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, उपाध्यक्ष संतोष स्वामी, राजू कदम, पालक बजरंग पवार, रविकिरण पवार, मुख्याध्यापक भारत निळे, क्रीडा शिक्षक नाईक उपस्थित होते. यावेळी घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सुरेश जगताप म्हणाले, ओंकारस्वरूपा कॉलेजने अल्पावधीतच शैक्षणिक क्षेत्रात गगनभरारी घेतली आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात ते कौतुकास्पद आहे.

सचिव संतोष पाटील म्हणाले, ओंकारस्वरूपा कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी मागील सहा महिन्यात क्रीडा क्षेत्रात घवघवीत यश संपादन करून संस्थेचा नावलौकिक वाढविला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. प्रास्ताविक, स्वागत व आभार प्राचार्य भारत निळे यांनी मानले



## किंडरगार्टन कार्यक्रम ...






## ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशीप परीक्षा ...

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनि. कॉलेज येळवीच्या वतीने Brain Development Scholarship (B.D.S.) ही स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती या परीक्षेच्या निकालानंतर यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत व सत्कार प्रशालेच्या वतीने करण्यात आला...





## सायन्स डे ...



## छत्रपती शिवाजी महाराज जयंती ...

